# प्रकरण - १

## आत्मचरित्र - अेक वाङ्मयप्रकार

# प्रकरण - १

## आत्मचरित्र - अेक वाङ्मयप्रकार

### प्रास्ताविक

साहित्य हे मानवी जीवनाचे अेक महत्वाचे अंग आहे. मनुष्य जसजसा बुध्दिमान होत गेला, विचारवंत होत गेला, तसतसा तो सामाजिक जीवनाशी अधिकाधिक समरस होत गेला. या समरसतेतून तो दुसऱ्या व्यक्तीसमोर आपल्या मनातील विचार, भावना व कल्पना अभिव्यक्त करू लागला. अशा अभिव्यक्तीच्या विकासामध्ये कधी कधी त्याला असे जाणवू लागले की आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना केवळ व्यक्त करण्यापेक्षा त्या अुत्कटत्वाने व सौंदर्यपूर्णरीतीने व्यक्त केल्या तर त्याचा परिणाम अधिक होतो आणि त्याचा प्रभावही पडतो. ही जाणीव ज्यावेळेस त्यास झाली त्याच वेळेला मानवी जीवनात कला जीवनाचे बीजारोपण झाले, असे आपणास म्हणता येअील. मनुष्य हा अधिकाधिक प्रगतीशील होताना तो संस्कृतीमय झाला आणि कला ही त्याच्या सांस्कृतिक जीवनाची अेक महत्वाची फलश्रुती ठरली.

अशा कलामध्ये साहित्य ही नंतरची कला असली तरी ती सर्व कलापेक्षा अधिक महत्वाची व अधिक सामर्थ्यशाली अशी अभिव्यक्ती आहे. त्यामुळे सर्व कलापेक्षा साहित्यकलेचा अधिक प्रसार झालेला दिसून येतो. कारण शब्द हे जे साहित्याचे माध्यम ते मानवी जीवनाशी अधिक निकटवर्ती आहे आणि अितर कोणत्याही माध्यमापेक्षा या माध्यमातून - शब्दातून-मनुष्य स्वत:ला अधिक समर्थपणे व्यक्त करू शकतो. त्याची मूळ प्रेरणा ही मानवी मनात व जीवनात असते. त्यामुळे साहित्य व जीवन यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे.

साहित्य समीक्षकांनी साहित्याच्या विविध दृष्टिकोणातून व्याख्या केल्या असल्या तरी साहित्याची मानवी जीवनापासून फारकत करता येणार नाही. निदान साहित्यातील काही वाङ्मयप्रकार तरी असे आहेत की, ज्यांचा जीवनाशी अगदी जवळचा संबंध असतो. काही साहित्यिकही असे असतात की जे जीवनाच्या आधारेच आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती करीत राहतात, जीवनाचा शोध घेत राहतात. मॅथ्यू अर्नाल्डने 'Poetry is the criticism of life under the conditions fixed for such a criticism by the laws of poetic truth and poetic beauty [1]' असे जे उद्‌गार काढले आहेत, ते महत्वपूर्ण आहेत.

साहित्यात जीवनानुभवांचा अविष्कार असतो त्याप्रमाणे जीवनभाष्यही असते. आपल्याला आलेल्या विविध अनुभवांचा अविष्कार करता करता अनाकलनीय, व्यामिश्र व गुंतागुंतीच्या असलेल्या जीवनाचे स्वरुपही स्पष्ट करावे, अशी साहित्यकाराची अपेक्षा असते. यातूनच सर्वप्रकारच्या, साहित्यकृतींचा उगम झाला आहे. कथा, कादंबरी, नाट्य, काव्य या सर्वांच्या मुळाशी लेखकाची जीवनानुभूती असते, अर्थात आपले जीवनानुभव प्रत्येकजण वेगवेगळ्या पध्दतीने व्यक्त करीत असतो. सामान्यत: त्याबाबतीत आपणास दोन प्रवृत्ती दिसतात. - १. वस्तुनिष्ठ चित्रण - स्वत:ला अलिप्त ठेवून स्वत:चे किंवा अितरांचे अनुभव व्यक्त करणे, २. आत्मनिष्ठ चित्रण - स्वत:चे किंवा अितरांचे अनुभव स्वत:च्याच अनुभवांच्या आधारे चित्रित करणे, वास्तविक पाहता या प्रवृत्ती केवळ साहित्यकारांच्या नसून त्या मानवी प्रवृत्तीच आहेत. मानसशास्त्राने introvert (अंतर्मुख) व extrovert (बहिर्मुख) या शब्दात या प्रवृत्तींचे वर्णन केले आहे, या प्रवृत्ती साहित्यकारांच्या ठिकाणीही आढळतात. त्यातील आत्मनिष्ठ प्रवृत्तीतून जे वाङ्मयप्रकार निर्माण झाले आहेत, त्यात आत्मनिष्ठेचीच कसोटी लावायची झाली तर आत्मचरित्राला पहिले स्थान द्यावे लागेल. कारण अितर कोणत्याही

वाङ्मयप्रकारामध्ये ` सत्य ` असले तरी त्या सत्याचा कलात्मक, कल्पनाविलासात्मक, सौंदर्यात्मक अविष्कार झालेला असतो. म्हणूनच साहित्यात केवळ सत्य नसून सत्याभास असतो. परंतु आत्मचरित्रात सत्याभासाला स्थान नसून केवळ सत्यालाच महत्व असते. जीवनाचे यथार्थ चित्रण ही तर त्याची मूळ प्रेरणा.

आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीचा अितिहास होय. त्यामुळे अितिहासातील सत्याप्रमाणें त्याचे स्वरूप असते. आत्मचरित्राला ललितकृती म्हणण्याअैवजी अैतिहासिक कृती म्हणावे काय, असा अेक प्रश्न त्यामुळेच अुपस्थित होअू शकतो. परंतु अितिहासकाराची भूमिका व आत्मचरित्रकाराची भूमिका पाहता आत्मचरित्राला अितिहास म्हणणे, शास्त्राचा अेक प्रकार म्हणणे अवघड आहे. कारण अितिहासकार घटनापासून अलिप्त असतो, तसा आत्मचरित्रकार अलिप्त असत नाही. आत्माविष्कार ही अितिहासाची प्रेरणा नसून ललितवाङ्मयाची प्रेरणा आहे. म्हणून आत्मचरित्राला ललितकृती असेच म्हणणे योग्य ठरेल. आत्मचरित्रात घटना असतात पण त्यांचे कलात्मक चित्रण असते. आत्मचरित्र लिहिणाऱ्या लेखकाच्या भावना, कल्पना, विचार, भाषाशैली यांचा त्या लेखनास स्पर्श झालेला असल्याने आत्मचरित्राचे स्वरूप कथा-कादंबरी सारखे मनोरंजक बनलेले असते. आत्मचरित्रात कल्पनाविलासात्मक वर्णन नसते, तसेच अितिहासाप्रमाणें घटनांचा केवळ रूक्ष तपशीलही नसतो. अितिहासाची सत्यनिष्ठता व कथावाङ्मयाची मनोरंजकता यांचा त्यात मिलाफ झालेला असतो. म्हणून आत्मचरित्र हे अेकाच वेळी अितिहास आणि कादंबरीही असते. अर्थात आत्मचरित्रकाराने कोणत्या भूमिकेतून आत्मचरित्र लिहिले आहे, ~~याबद्द~~ यावरही त्याची कलात्मकता अवलंबून असते. परंतु बहुधा आत्मचरित्राची प्रकृती ही ललितवाङ्मयाच्या प्रकृतीशी जुळणारी असल्याने अेक ललितकृती म्हणूनच तिचा विचार करणे योग्य ठरते.

परंतु ही ललितकृती कथा, कादंबरी, कविता, नाट्य या वाड्.मय प्रकाराप्रमाणें तंत्रनिष्ठ असत नाही. आत्मचरित्र हा अेक मुक्त वाड्.मयप्रकार आहे. आत्मचरित्राचे विशिष्ट असे तंत्र नसल्याने प्रत्येक आत्मचरित्र दुसऱ्या आत्मचरित्रापेक्षा वेगळे आढळते. प्रत्येकाचे आयुष्य हे अेखाद्या कादंबरीप्रमाणेंच विविध भावपूर्ण घटनांनी ओथंबलेले असते. अगदी रुक्ष, अेकमार्गी आणि नीरस, लालित्याचा किंचितही स्पर्श न झालेले असे मानवी जीवन संभवू शकत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीहून अनेक अर्थानी भिन्न असते. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी जीवन नावाचे तत्व अेकच असले तरी नानाप्रकारची चित्रविचित्र रसायने त्या जीवनात सृष्टीने मिसळलेली असतात. रुसोचे 'कन्फेशन्स' आणि आपल्याकडील वि.रा. शिंदे यांचे 'माझ्या आठवणी आणि अनुभव' ही आत्मचरित्रे तुलनेसाठी घेतली तर असे जाणवते की देश, काल, परिस्थिती, सामाजिक दृष्टी, वृत्ती, जीवन विषयक विचार या सर्व बाबतीत कमालीची भिन्नता आढळून येते. मानवी जीवनालाच जेथे विशिष्ट आकार नाही तेथे त्याच्या चित्रणाला तरी विशिष्ट आकारात आणि तंत्रात कसे बांधता येअील ? म्हणून अशा वाड्.मयकृतीची समीक्षा ही तंत्रनिष्ठ करण्यापेक्षा आस्वादनिष्ठ करणे योग्य ठरेल.

## आत्मचरित्राची व्याख्या:

आत्मचरित्र हा अेक वैशिष्ट्यपूर्ण वाड्.मयप्रकार आहे. आत्मचरित्र हे अेका व्यक्तीचे चरित्र असून ते तिने स्वतःच लिहिलेले असते. आत्मचरित्रकार आपल्या जीवनाचा पट स्वतःच अुलगडून दाखवितो, स्वतः अनुभविलेल्या जीवनाचे चित्र स्वतःच रेखाटतो. म्हणून प्रत्येक आत्मचरित्र हा लेखकाच्या स्वजीवनाचा अितिहास असतो. श्री. रा.ग.जाधव यांनी 'आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे स्वतः लेखकाने

लेखनरुपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय[२] ` अशी आत्मचरित्राची अशी ~~अ~~ व्याख्या केली आहे.

चरित्र व आत्मचरित्र:

आत्मचरित्र हा चरित्रवाङ्मयाचाच अेक प्रकार आहे. चरित्रात चरित्रलेखक व चरित्रविषयीभूत व्यक्ती ही भिन्न असतात. आत्मचरित्रात मात्र या दोन्ही भूमिका अेकाच व्यक्तीला पार पाडावयाच्या असतात. त्यामुळे सहाजिकच आत्मचरित्राला अेक मर्यादाही येते. आत्मचरित्र हे कधीही संपूर्ण असू शकत नाही कारण त्यामध्ये व्यक्तीच्या जन्मापासून तिच्या मृत्यूपर्यंतची हकीकत येवू शकत नाही. म्हणून डब्ल्यू.अेच. डन या ग्रंथकाराने आत्मचरित्राचे ` मस्तक व अवयवविरहित मूर्ती ( The true autobiography is but a torso ) १ असे वर्णन केले आहे. तथापि चरित्रकार देखील आवश्यक अशा निवडक घटनांच्या सहाय्याने चरित्रनायकाच्या जीवनावर प्रकाश पाडू शकतो. आत्मचरित्रकाराला आपल्या आयुष्यातील वैशिष्ट्यपूर्ण घटनांचीच निवड करुन आपल्या जीवनाचे चित्र रंगवायचे असते. तथापि जन्ममृत्यूच्या सीमारेषांना स्पर्श न करताही व्यक्तिजीवनाचे समग्र दर्शन घडविणे शक्य असल्याने अपूर्णता हा आत्मचरित्राचा दोष मानता येणार नाही. स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकरांच्या ` माझी जन्मठेप ` या आत्मचरित्रामध्ये त्यांच्या जीवनातील भयानक अंदमानपर्वाचाच भाग समाविष्ट असला तरी त्यामुळे त्यांच्या भव्योदात्त व्यक्तिमत्वाचे दर्शन वाचकांना घडल्याशिवाय रहात नाही.

चरित्र हे वस्तुनिष्ठ असल्याने असंख्य अुपलब्ध अशा बाह्य पुराव्यांच्या आधारे चरित्रकाराला चरित्र- नायकाच्या बाह्यजीवनाकडून त्यांच्या आंतरजीवनाकडे जावे लागते. चरित्रनायकाच्या जीवनातील विविध घटना व प्रसंग घेवून तो त्याचे व्यक्तिमत्व रेखाटत असतो. या अुलट आत्मचरित्रकार हा आपल्या चरित्राचा स्वत:च लेखक असल्याने आत्मनिष्ठपणे तो आपली

मन:प्रवृत्ती वाचकापुढे अुघड करून आपल्या जीवनात घडलेल्या घटनांची संगती दर्शविण्याचा प्रयत्न करतो. चरित्रकार हा चरित्रनायकाच्या अंत:करणापर्यंत पोहचू शकला नाही, तर त्याचे चरित्रलेखन कलात्मक ठरणार नाही. आत्मचरित्रकार मात्र आपले अंत:करण वाचकांना अुघडे करून दाखवू शकतो व त्याचप्रमाणे आपल्या जीवनातील विविध घटना, प्रसंग व अनुभव यांचे कथनही करू शकतो. याप्रमाणे तो आपल्या आंतर व बाह्य, दोन्ही जीवनाचे दर्शन घडवू शकतो म्हणून डॉ. जॉन्सनने ' Every man's life may be best written by himself '[४] असे अुद्गार काढले आहेत. बॉस्वेलने जॉन्सनचे चरित्र लिहिले पण त्यालाही डॉ. जॉन्सनने आपले आत्मचरित्र लिहून ठेवले असते तर बरे झाले असते, असे वाटत असे.

चरित्रलेखनासाठी असामान्य व्यक्तीची नायक म्हणून निवड करणे योग्य असते. तथापि आत्मचरित्रांचे लेखन करण्यासाठी असे कोणतेच बंधन नाही. सामान्य माणसाचे सत्यदर्शन घडविणारे आत्मचरित्र देखील श्रेष्ठ दर्जाचे ठरू शकते. '.... any life, however insignificant would, if truthfully told, be of interest '[५] हे कोलरिजचे वचन या दृष्टिकोणातून लक्षात ठेवण्याजोगे आहे.

चरित्र व आत्मचरित्र या दोन्हीही वाङ्मयप्रकारातील चरित्रविषयीभूत व्यक्ती सामान्य असो वा असामान्य, परंतु ती वास्तवातीलच असते, हे या दोन्ही वाङ्मयप्रकारातील अेक साम्य म्हणून सांगता येअील. कथा-कादंबरी , नाटक वा अितर ललित साहित्यकृतीतील नायक-नायिकाप्रमाणे ती कल्पनानिर्मित नसते. वास्तवाचे अधिष्ठान लाभलेल्या चरित्र नायकाच्या चित्रीकरणातून मानवी स्वभावाचे खरे दर्शन घडविणे हे चरित्र या वाङ्मयप्रकाराच्या मर्यादामुळे पूर्णत: शक्य नसते. तथापि आत्मचरित्रकार हाच स्वत: लेखक असल्याने आत्मचरित्रातून मानवी स्वभावाचे खरे दर्शन अधिक प्रभावीपणे घडू शकते.

आत्मचरित्रकार आपले अंतरविश्व वाचकापुढे समर्थपणे उभे करू शकतो. जे.पी.नाईक यांनी या संदर्भात व्यक्त केलेले विचार महत्वाचे वाटतात. ते म्हणतात, ' Autobiography is primarily subjective. It is built from within outward. The invisible world within the individual is revealed to the readers and that too by no loss an authority than the individual himself. It is therefore first-hand and direct information and no guess-work.'[६] ही first-hand information चरित्रकाराला उपलब्ध नसल्याने त्याला चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्यात अडचणी येतात. चरित्रनायकाच्या कृतीतून नेहमीच त्याचे व्यक्तिमत्व दिसून येते असे त्याला निश्चयाने सांगता येत नाही. म्हणूनच डॉ. जॉन्सन म्हणतो , ' The biography is likely to be truthful if it is an autobiography.'[७]

ओकवेळ चरित्रलेखन सोपे ठरेल, परंतु आत्मचरित्रनिवेदन म्हणजे तारेवरील कसरत आहे. नायकाच्या चरित्राची साधने जमा करून व त्याच्या जीवनाशी समरस होऊन सत्यशोधन करणे हे तितकेसे कठीण नाही. परंतु स्वत:विषयी व स्वत:च्या जीवनातील घटनाप्रसंग व अनुभवाविषयी अलिप्तता स्वीकारून निवेदन करणे सामान्य माणसाच्या शक्तीबाहेरची गोष्ट आहे. चरित्रकाराप्रमाणें आत्मचरित्रकाराला कल्पनाशक्ती, बुद्धिमत्ता, व्यासंग व [illegible] परिश्रम यांची विशेष आवश्यकता नसतानाही आत्मचरित्राचे कलात्मक लेखन करणे म्हणूनच कठीण असते. क चरित्र व आत्मचरित्र हे दोन्हीही वाङ्मयप्रकार ओकमेकाशी निगडित असले तरी मूलत: ते स्वतंत्र व स्वयंभू असे आहेत.

कादंबरी व आत्मचरित्र
------------------

कादंबरी व आत्मचरित्र या दोन्ही वाड्.मय प्रकारामध्ये व्यक्तिजीवनाची कहाणी आलेली असते. मानवी जीवनाचे दर्शन घडविणे हे दोहोंचेही उद्दिष्ट आहे. तथापि आत्मचरित्रातील कथेचे पाय वास्तवाच्या पक्क्या मातीत रोवलेले असतात, तर कादंबरीतील कथानक हे पूर्णपणे काल्पनिक असू शकते. मनोरंजन हे कादंबरीचे ध्येय असते तर आत्मचरित्रामध्ये आत्माविष्करणाची भूमिका प्रधान असते. कादंबरी हा ' फॉर्म ' असल्यामुळे तंत्राची बंधने जशी त्याला लागू असतात, तशी आत्मचरित्राला लागू नसतात. म्हणून या दोन्ही वाड.मय प्रकारांची प्रकृती भिन्न आहे , असे म्हणावे लागेल.

कादंबरीतील नायक हा कल्पनानिर्मित असला तरी त्याचे चित्रण वास्तवदर्शी करण्याचा प्रयत्न कादंबरीकार करतो. अशावेळी तो प्रत्यक्षातील अनुभवांची नवीन रचना अगर संपूर्ण कायापालट करू शकतो. कादंबरीतील प्रसंग सौंदर्यपूर्ण , संघर्षमय व हृदयस्पर्शी करण्यासाठी तो सत्य व कल्पिताचे मिश्रणही करू शकतो. आत्मचरित्रकाराला मात्र हे स्वातंत्र्य मिळू शकत नाही. आपल्या जीवनातील वास्तवाला कल्पनेचे अस्तर तो लावू शकत नाही. तथापि आत्मचरित्र लिहिताना तो वाचकांना प्रभावित करतील अशा घटनांची व प्रसंगांची निवड व जुळणीही करू शकतो. आत्मचरित्रकाराला आपल्या संपूर्ण जीवनाचे दर्शन घडवायचे असते. कादंबरीकाराला हे बंधन नसते. तो आपल्या नायकाच्या जीवनाचे संपूर्ण दर्शनही घडवू शकेल किंवा त्यातील एखाद्या कालखंडाचे चित्रणही करू शकेल.

कादंबरीकार आपल्या पात्रांची निर्मिती त्याला आलेल्या जीवनानुभवावरून किंवा कल्पनाशक्तीने करू शकतो. ही पात्रे वाचकांना अमानवी किंवा अवास्तव वाटू नयेत याची काळजी तो घेतो. आपल्या

कल्पनाशक्तीने प्राण ओतून त्यामध्ये जिवंतपणा व असलपणा आणतो. आत्मचरित्रातील पात्रे मात्र खऱ्याखुऱ्या हाडामांसाची व शंभर टक्के सत्य असतात. अ.म. जोशी म्हणतात, ` कादंबरीकार आपणच निर्माण केलेल्या पात्राच्या अंत:करणात बुडी मारून त्याच्या वर्तनाची संगती लावण्याकरिता आपणांस अनुकूल अशी प्रमाणे काढू शकतो. परंतु अीश्वरनिर्मित मनुष्य हा असा अजब प्राणी आहे , त्याचे मन समुद्रासारखे अितके खोल आहे , की त्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य बुडून मात्र मरावयाचा ! ` [८] यास्तव आत्मचरित्रकाराने स्वत:चे व त्याला जीवनात भेटलेल्या व्यक्तीचे केलेले चित्रण बऱ्याच वेळा अपूर्ण व विवादास्पद देखील ठरू शकते. आपल्या जीवनातील काही अनुभव किंवा व्यक्तीसंबंधाने घडलेल्या घटना अप्रिय म्हणून आत्मचरित्रकाराने टाळण्याचा प्रयत्न केला तर ते आत्मचरित्र परिपूर्ण ठरू शकणार नाही. ना.सी. फडके यांचे ` माझे जीवन - अेक कादंबरी ` हे आत्मवृत्त म्हणूनच कादंबरीसदृश ठरले आहे !

आत्मचरित्रात केवळ आयुष्यातील घटनांची जंत्री दिली तर ते रूक्ष व नीरस होअील व कथा, कादंबरी सारखी आकर्षकता त्याला प्राप्त होणार नाही. परंतु आत्मचरित्रकाराने जीवनातील हृदयस्पर्शी घटना व समरप्रसंगांची नाट्यपूर्ण मांडणी करीत प्रसन्न व मोहक शैलीत आत्मनिवेदन केले तर ते कथा-कादंबरी अितकेच आकर्षक व कलात्मक ठरू शकेल. आत्मचरित्राला रंजकता यावी किंवा आत्मचरित्रलेखनाच्या काही पथ्यापासून सुटका व्हावी म्हणून आत्मचरित्रात्मक कादंबऱ्याही लिहिल्या गेल्या आहेत. अुदाहरणार्थ चार्ल्स डिकन्स याचे ` डेव्हिड कॉपरफील्ड.`

आत्मचरित्र व कादंबरी या वाङ्मयप्रकारांचे नाते स्पष्ट करताना श्री. गंगाधर गाडगीळ म्हणतात, `... आत्मचरित्र हे कादंबरीपेक्षा मूलत: भिन्न नाही. फरक अितकाच की आत्मचरित्र ही अेक कादंबरी असते आणि त्याच

वेळेला अेका व्यक्तीच्या जीवनाचा तो अितिहासही असतो. परस्परांशी अेकजीव झालेली ( निदान अेकजीव होण्याचा प्रयत्न करणारी ) दोन पुस्तके म्हणजे आत्मचरित्र.'[९] आत्मचरित्र व कादंबरी यांचा असा निकटचा संबंध आहे. आत्मचरित्र हे अेकाच वेळी अितिहास आणि कादंबरी असल्यामुळे अुत्कृष्ट आत्मचरित्र हे अितिहास म्हणून आणि कादंबरी म्हणून देखील अुत्कृष्ट असावे लागते.

आत्मचरित्राचे स्वरूप -

आत्मचरित्र म्हणजे स्वत: लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वत:च्या शब्दात सांगितलेली कहाणी. डॉ. नाअीक यांनी आपल्या साध्या व्याख्येतून म्हटले आहे, ' Autobiography in its simplest definition is the story of one's life written by oneself.'[१०] परंतु ते केवळ घटनांचे निवेदन नसते, तर घटनांचे सिंहावलोकन असते. म्हणून अेन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकामध्ये आत्मचरित्राबद्दल ' The account of an individual human life written by the subject himself'[११] असे जे म्हटले आहे, ते अर्थपूर्ण आहे. जीवनात स्वत:ला आलेल्या अनुभवाकडे तटस्थपणाने पहात लेखक आपली कहाणी सांगतो तेंव्हा ते आत्मचरित्र होते. प्रत्येक माणसाचे आयुष्य हे विविध घटनांनी रंगलेले असते. ते नाट्यपूर्ण, गुंतागुंतीचे व अनाकलनीय असते. जीवनाप्रमाणें व्यक्तिस्वभावही नाट्यपूर्ण व अनाकलनीय असतो. अशा व्यक्तिमत्वाचा व जीवनाचा शोध शास्त्र व कला नेहमीच घेत राहिले आहेत. हा शोध घेणे अवघड असते, म्हणून गोविंदाग्रजांनी म्हटले आहे,

यावज्जीवहि काय मी न कळले आप्तांप्रती नीटसे ।
मित्रांतेंहि कळे न गूढ - न कळे माझे मलाही तसें ।।[१२]

तरीही व्यक्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न नेहमीच केला गेला आहे. या शोधाला मर्यादा असल्या तरी त्या मर्यादेत शोध घेता येतो. म्हणून आत्मचरित्राचे महत्व

राहतेच. आपल्या जीवनातील विविध घटना, त्या घटनातील नाट्य, जीवनातील संघर्ष, आशा - आकांक्षा, यशापयश, सुखदु:खे, विविध प्रकारच्या भेटलेल्या व्यक्ती, त्यांच्याशी आलेले चांगले वाईट संबंध- या सर्वांचे चित्रण करता करता आत्मचरित्रकार जाणीवपूर्वक तर कधी अजाणता जीवनाचा शोध घेतो, जीवनभाष्य करीत राहतो. इतर कोणत्याही वाड.मयप्रकारापेक्षा हे जीवनभाष्य अधिक अर्थपूर्ण असते. कारण जीवनमंथनातून निर्माण झालेले ते एक नवनीत असते. चांगल्या प्रकारची आत्मचरित्रे ही बोधप्रद ठरतात ती याचमुळे. म्हणून जीवनशोध व मानवी मनाचा शोध हे आत्मचरित्राचे दोन महत्वाचे पैलू आहेत. आता प्रश्न असा उपस्थित होतो की आत्मचरित्रकार आत्मचरित्र लिहिण्यास प्रवृत्त का होतो ? आत्मचरित्राच्या पाठीशी विविध प्रकारच्या प्रेरणा असू शकतात.

आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणा -

आत्मचरित्र लेखनामागील महत्वाची प्रेरणा आत्माविष्कार ही होय. आत्माविष्कार हे तत्व अत्यंत महत्वाचे आहे. ते आत्मचरित्राचे जसे तत्व आहे, तसेच ललितवाड.मयाचेही तत्व आहे. आत्मचरित्र व ललितवाड.मय यांना जोडणारा तो महत्वाचा दुवा आहे. आत्मचरित्राला ललितवाड.मय म्हणावयाचे ते एवढ्याचसाठी.

आपली जीवितकहाणी कोणाला तरी सांगावी, आपल्या सुखदु:खात इतरांनाही वाटेकरी करावे, अशी माणसाची इच्छा असते. आपली दु:खे इतरांना सांगितली तर हृदय हलके होते व या सुखदु:खाच्या कथनात एक प्रकारचा विरंगुळाही वाटू लागतो. मालतीबाई बेडेकर आपल्या आत्मचरित्रामागील प्रेरणा स्पष्ट करताना म्हणतात, ` .... या अत्यंत दु:खाच्या व उद्विग्नतेच्या काळात मनाला केवळ विरंगुळा म्हणून मी या माझ्या आयुष्याच्या आठवणी

लिहायला घेतल्या. मी लेखन करीत असले की रोजच्या जीवनातल्या सुखदु:खाचा मला कांही काळ तरी विसर पडतो, हा आजवरचा अनुभव याहीवेळा प्रत्ययाला आला आणि खरोखरच या ' सहवास ' लेखनाने माझ्या अनिवार दु:खाला विरंगुळा मिळाला. '[१३] आत्मचरित्रकाराने आपल्या सुखदु:खाचे हे निवेदन अत्यंत स्वयंस्फूर्तीने केलेले असते, हा आत्मचरित्राचा अेक विशेष होय.

आपल्या जीवनातून अितरांना काही बोध किंवा शिकवण मिळावी, हा हेतू डोळ्यापुढे ठेवूनही काही लेखकांनी आपली आत्मचरित्रे लिहिली आहेत. संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक ल.रा. पांगारकर हे आपल्या ' चरित्रचंद्रा ' च्या प्रस्तावनेत म्हणतात , ' माझ्या चरित्रात कोणाही काही घेण्यासारखे नाही असे मला वाटले असते तर हे चरित्र लिहून प्रसिध्द करण्याचा हा अुद्योग मी केला नसता. '[१४] महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्यासारख्या समाजसुधारकानेही आपले आत्मचरित्र अुद्बोधनाच्या भुमिकेतूनच लिहिले आहे. तथापि अितरांना बोध देण्यासाठी स्वत:च्या दोषावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न आत्मचरित्रकाराने कधीही करू नये. तसेच आत्मचरित्रात अुपदेशावर भर देणे हेही अनिष्ट आहे, त्यामुळे आत्मचरित्राच्या कलात्मकतेला बाधा येण्याचा संभव असतो.

गतायुष्याचे सिंहावलोकन करावे, हाही माणसाचा अेक प्रवृत्तीधर्म असतो. आपल्या गतजीवनाचे सिंहावलोकन करताना तो जुन्या आठवणींची अपरिहार्यपणे अुजळणी करतो, व त्यामध्ये त्याला अेक प्रकारचा आनंद वाटतो, सुखद आठवणींना अुजाळा देण्याने आनंद वाटतोच पण दु:खद आठवणीही खूप काळ लोटल्यामुळे सुखदच वाटतात. या आठवणीकडे अलिप्तपणे पाहताना लेखकाला सविकल्प समाधीचा आनंद लुटता येतो. रोमन साम्राज्याच्या अुदयास्ताचा अितिहास लिहिणाऱ्या गिबन या सुप्रसिध्द अितिहासकाराने आपल्या आत्मचरित्राच्या आरंभी म्हटले आहे , ' वयाच्या बावन्नाव्या वर्षी माझे

अितिहास लेखनाचे कार्य संपूर्ण - झाल्यामुळे आता रिकाम्या वेळात गतायुष्यावर अेकदा दृष्टी टाकण्याची मला अिच्छा होत आहे. तसे करण्यात स्वत:च्या मनाचे समाधान हा अेकच हेतू आहे व तेच माझे फल होय. ` [१५]

गतायुष्यातील आठवणी सांगताना आपल्या हातून घडलेल्या चुका, प्रमाद व गैरकृत्ये जनताजनार्दनापुढे मांडण्यातही अेक आत्मिक समाधान असते. महात्मा गांधीनी आपल्या ` सत्याचे प्रयोग ` या आत्मकथेत आपल्या अपराधांची कबुली दिली आहे. रुसो या फ्रेंच लेखकाने तर आपल्या आत्मचरित्राला ' Confessions ' ( कबुली जबाब ) असेच नांव दिले आहे. आपल्या ग्रंथाच्या आरंभी तो म्हणतो, ` जेंव्हा मला देवाघरचे बोलावणे येअील तेंव्हा मी हे माझे आत्मचरित्र अिश्वरासमोर ठेवीन आणि म्हणेन की ` देवा, मी अशा अशा त-हेने जगात वागलो आहे, माझी पुण्यकृत्ये व पापे मी प्रामाणिकपणे तुझ्यासमोर ठेवीत आहे. ` [१६] ख्रिस्ती माणसाने आपल्या धर्मगुरुपुढे दिलेल्या जबाबाप्रमाणें या कबुली जबाबाचे थोडेफार स्वरुप असते.

राजकीय नेते , समाजसुधारक व देशभक्तांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात त्यांच्या कार्याचा प्रचार व आत्मसमर्थन आढळते. प्रसंगी ते आपले वैचारिक सिध्दान्तही आत्मचरित्राव्दारा मांडतात. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या ` आत्मवृत्ता ` त त्यांनी केलेल्या स्त्री-शिक्षणाच्या कार्याचा प्रचार व त्यांनी स्थापलेल्या संस्थाची माहिती आढळते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ` माझी जन्मठेप ` मध्येही त्यांच्या तत्वज्ञानाचा व कार्याचा सहाजिकच अंतर्भाव झालेला आहे. हिटलर व मुसोलिनी या दोन युध्दपिपासू राजकीय नेत्यांनीही आपली आत्मचरित्रे लिहून आपल्या राजकीय तत्वज्ञानाचा प्रचार केला आहे. अगदी अलिकडेच अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री डॉ. हेन्री किसिंजर यांनी -

' The White house years ' आणि ' The years of upheaval ' हे दोन आत्मचरित्रपर ग्रंथ लिहून आपली आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिका स्पष्ट केली आहे. अशा प्रकारच्या आत्मचरित्रातून आपल्या संबंधी झालेले गैरसमज दूर करून स्वत: केलेल्या कृत्यांचे समर्थन करणे हाही भाग असतो. तथापि स्वसमर्थनार्थ आत्मचरित्रे लिहिणे हे वाङ्मयीन दृष्टिकोणातून अुचित ठरत नाही. लेखकाने आपल्या कार्याबद्दल व स्वभावाबद्दल स्वत: काही न सांगता त्याबद्दलचा निर्णय वाचकावर सोपविणे शिष्ट ठरेल.

प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या मते "…. आपल्या साऱ्या स्मृतिरूप अनुभवांना सजीव करून त्यांची स्पंदणारी प्रतीती घेणे, त्याचा आकार जाणिवेत अुमटविणे, त्यांच्याकडे अेका वेगळ्या कुतूहलाने आणि म्हणूनच तटस्थपणे पाहणे , आपल्या अनुभवांना संकेतरूप देअून स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे , अशा प्रकारे त्यांना अजर आणि अमर करणे "[१७] हे कार्यही आत्मचरित्रलेखनाच्या व्दारे साधता येण्यासारखे असते. हे कार्य ललित लेखकाच्या कार्याशी जुळणारे असल्याने ललितलेखक आपली ललितकृती ज्या पध्दतीने सिध्द करतो त्याप्रमाणेंच आत्मचरित्र--काराने आपले आत्मचरित्र सिध्द केले पाहिजे.

## आत्मचरित्राचे स्वरूपविशेष

### सत्यदर्शन

आत्मचरित्र ही जीवनकथा असते. लेखकाच्या जीवनात ज्या ज्या घटना घडलेल्या असतात, त्या घटनांचे त्याने निवेदन केलेले असते. अेका दृष्टीने स्वत: लेखक हाच त्या जीवनकथेचा नायक असतो. त्या नायकाचे ते मनोगत, स्वगत असते. त्यामुळे त्या घटनांचे तो तन्मयतेने वर्णन करतो. परंतु आत्मचरित्रकाराने त्या घटना वाटेल त्या प्रकारे सांगून अुपयोगाच्या नाहीत. त्याने सर्वच घटना सांगितल्या पाहिजेत, असेही नाही. ज्या घटना पूर्णपणे आठवतात, त्या जशा घडल्या तशाच त्याने कथन केल्या पाहिजेत, म्हणून बालपणातील अेकीव घटना

सांगून त्या आधारे आपले व्यक्तिचित्रण करण्याचा प्रयत्न त्याने करु नये. तसेच आपल्याच दृष्टिकोणातून अेकांगी चित्रणही करु नये. म्हणजेच घडलेल्या घटनांशी त्याने अिमान राखले पाहिजे. मर्ढेकरांनी म्हटल्याप्रमाणे, ' आत्मनिष्ठा हा वाङ्मयनिर्मितीचा आद्यबिंदू तर आहेच आहे, पण त्याहीपेक्षा अधिक म्हणजे आत्मनिष्ठेतच वाङ्मयनिर्मितीची परिणती आहे. वाङ्मयनिर्मितीची सुरुवात ज्याप्रमाणें आत्मनिष्ठेपासून व्हावयास पाहिजे, तसा तिचा शेवटही आत्मनिष्ठेतच व्हावयास पाहिजे. '[१८] म्हणजे अनुभवाशी आत्मनिष्ठ राहून चित्रण केले पाहिजे. यालाच आपण सत्यदर्शन म्हणू शकतो. सत्यदर्शनाविरहित असलेले आत्मचरित्र अेक कादंबरीच ठरेल! आपल्या जीवनातील सत्याचे दर्शन घडविण्यासाठी लेखकाला कठोर आत्मनिरीक्षण करता आले पाहिजे. तादात्म्याबरोबरच तटस्थवृत्तीही धारण करता आली पाहिजे. आत्मचरित्रलेखनाचा हा विशेष अ.ना. देशपांडे यांनी पुढील प्रमाणें स्पष्ट केला आहे - 'आत्मचरित्र-निवेदन म्हणजे तारेवरची कसरत. आत्मश्लाघेचा व आत्मसमर्थनाचा आपल्यावर आरोप कह येणार नाही, याबद्दल पदोपदी दक्षता बाळगायची आणि त्याचबरोबर जास्तीत जास्त अलिप्तवृत्ती स्वीकारुन आपल्या स्वभावविशेषांचे, गुणदोषांचे आणि कर्तृत्वाचे यथातथ्य दर्शन घडवून देण्याची खटपट करावयाची, असे दुहेरी धोरण आत्मचरित्रकाराला सांभाळावे लागते. '[१९]

जीवनाचे यथातथ्य दर्शन घडविण्यासाठी लेखकामध्ये सत्यप्रेम व प्रामाणिकपणा हवा. ' नामूलं लिख्यते किंचित् ' हे त्याचे ब्रीदवाक्य असले पाहिजे. सत्यलेखनाने आपल्या व्यक्तिमत्वाची हानी होअील असा विचार मनात येअून असत्यलेखनाचा मोह त्याला होता कामा नये. गोदावरी परुळेकर आपल्या आत्मचरित्राबद्दल म्हणतात, " जेंव्हा माणूस जागा होतो " हे पुस्तक जे पाहिले,

जे अनुभवले तेच शब्दांकित करायचे या उद्देशाने लिहिल्यामुळे वस्तुस्थितीपेक्षा वेगळे काही लिहिण्याचा मोह मला कधीच झाला नाही. " वस्तुस्थितीशी इमान राखून केलेले आत्मनिवेदन हेच आत्मचरित्राचे खरे बळ आहे. म्हणूनच महात्मा गांधींचे ' सत्याचे प्रयोग ' व रुसोचे ' कन्फेशन्स ' ही आत्मचरित्रे उच्च कोटीची ठरली आहेत. अर्थात हे सत्यदर्शन घडविताना प्रांजळपणा हवा , तसेच फाजील विनय नको की आत्मस्तुतीही नको. लेखकाने इतरांचे दोषदर्शन घडवू नये व आत्मप्रदर्शन वा आत्मगौरवाचा मोहही टाळावा.

सत्यदर्शन हे आत्मचरित्राचे प्रमुख वैशिष्ट्य असलेतरी संपूर्ण सत्याचे दर्शन घडविणे हे अत्यंत कठीण असे कार्य आहे. आपल्या जीवनातील काही गोष्टी आत्मचरित्रकार विसरतो तर काही अप्रिय घटनांचे त्याला बुध्द्याच विस्मरण होते. आपली जीवनकथा हा कलेचा एक उत्तम नमुना व्हावा या इच्छेतून तो काही कटु घटना वगळतो व कलात्मकतेसाठी तपशीलाची काटछाटही करतो. अशा संक्षेपामुळे मूळ सत्याचे स्वरूप बदलण्याचा संभव असतो. म्हणूनच अत्यंत विश्वसनीय असे आत्मचरित्र लिहिले जाणे अत्यंत कठीण असते. डॉ. गं.बा. ग्रामोपाध्ये यांनीही आत्मचरित्राविषयी बोलताना एका मुलाखतीत हेच मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, " सत्य, संपूर्ण सत्य सांगावे, अशी आपली अपेक्षा असली तरी ते फार कठीण आहे. नावनिशीवार उल्लेख, बदनामी, भावना दुखविणे इत्यादीमुळे अशक्य ' World within World ' मध्ये स्टीफन स्पेंडर फक्त त्याला वैशिष्ट्यपूर्ण वाटणाऱ्या गोष्टींचाच उल्लेख करतो. काही स्त्रियांची आत्मचरित्रे मोकळेपणाने लिहिली गेली आहेत. ती वाङ्मयाला जवळची आहेत. पण ' स्मृतिचित्रा ' सारखी क्वचितच. आत्मचरित्रांचं मूल्यमापन कसं करणार ! घड फिक्शन नाही की धड सत्यही नाही अशीच आत्मचरित्रं मराठीत अधिक आहेत.[२१]

आत्मचरित्रकार जे लिहितो ते सत्य तर असावेच पण त्याबरोबरच ते सुंदरही व्हावे अिकडे लक्ष दिले पाहिजे. आकर्षकपणे मांडलेली अेक वास्तववादी कहाणी असे त्याचे स्वरुप असावे. आपल्या जीवनातल्या कोणत्या गोष्टी वाचकापुढे मांडाव्याच्या याचे ज्ञान लेखकाला असणे आवश्यक आहे. आत्मचरित्राचे अितिहासाशी साम्य असले तरी तो अितिहास नव्हे म्हणून त्यात बाल्यापासून अंतापर्यंतचे सर्व प्रसंग येणे शक्य नाही. आपल्या जीवनातील जे प्रसंग त्याला आठवावेसे वाटतील व जे कलात्मकदृष्ट्या योग्य असतील ते आत्मचरित्रकार वाचकांना निवेदन करु शकतो. आपली जीवनगाथा रसपूर्ण, मनोरंजक, अुत्कंठावर्धक करण्यासाठी नाट्यमयता, संघर्ष, योगायोग दर्शविणाऱ्या घटना व प्रसंग आत्मचरित्रात असावेत. लेखकाची अभिव्यक्तीची पध्दती, त्याची शैलीही प्रसन्न व आकर्षक असावी. लेखकाला सौंदर्यदृष्टी असेल तर आपले आत्मचरित्र कलात्मक करण्यासाठी तो निश्चितच प्रयत्नशील राहील.

आत्मचरित्रात कलात्मकता असली म्हणजे त्यात काही दोष असले तरी त्यांचे विस्मरणच होते. याबाबतीत न.चि. केळकर यांच्या " गतगोष्टी " या आत्मचरित्राबद्दल अ.म.जोशी यांनी व्यक्त केलेला अभिप्राय लक्षात घेण्याजोगा आहे. ते म्हणतात, " .... ज्या ठिकाणी ते राजकारणाच्या प्रांतात शिरले आहेत, त्या ठिकाणी त्यांची स्वत्वाची जाणीव असली मारुन वर आल्यासारखी वाटते, व शुध्द भावनेची जागा वासनेने घेतल्यासारखी वाटते. हा दोष जरी असला तरी भाषेचे व वर्णनाचे लालित्य, कथनातील खेळकरपणा व आत्मपरीक्षणातील मार्मिकता अित्यादी गुणामुळे केळकरांचे आत्मचरित्र कोणत्याही आत्मचरित्र-वाङ्मयात महत्वाचे स्थान मिळवील, यात शंका नाही. "[२२]

भावनाविष्कार
------------

आत्मचरित्र म्हणजे लेखकाच्या जीवनात घडणाऱ्या घटनांचे निवेदन होय. या निवेदनात सत्यनिष्ठता, तटस्थता अित्यादी गुण असावेत, असे म्हटले जाते.

त्यामुळे आत्मचरित्र लेखकावर अनेक बंधने पडतात, आणि त्याचे लेखन रुक्ष बनते. परंतु आत्मचरित्र हे केवळ निवेदनात्मकच असावे असे नाही. ते कलात्मकही असावे लागते. त्यामुळे, ज्यामुळे त्या लेखनात सौंदर्य निर्माण होईल व वाचकांना त्यापासून आनंद मिळेल अशा प्रकारची सौंदर्य निर्मिती करता आली पाहिजे. प्रसंगांचे वर्णन , त्यातील नाट्यमयता, प्रसंगांचा परस्परसंबंध, प्रसंगवर्णनातील मार्मिकता, सुंदर भाषाशैली यासारख्या गुणांनी लेखक आत्मचरित्रात कलात्मकता निर्माण करू शकतो. अर्थात ही कलात्मकता सहजस्फूर्त व नैसर्गिक असावी. कादंबरी किंवा नाटक चित्ताकर्षक व मनोरंजक करण्यासाठी लेखक काही युक्त्यांचा, तंत्रांचा वापर करू शकतो, त्याला ते स्वातंत्र्य असते. परंतु आत्मचरित्रकाराला अशाप्रकारचे स्वातंत्र्य असत नाही. कारण आत्मचरित्र कलात्मक करण्यासाठी त्याने अशा काही तंत्राचा वापर केला की त्याचे आत्मचरित्र हे तटस्थतेकडून ढळू लागते. त्यातील सत्यदर्शनाला बाधा येते आणि हळूहळू आत्मचरित्राचे कादंबरीत रूपांतर होऊ लागते. म्हणून आत्मचरित्रलेखकाला कलात्मकतेच्या बाबतीत सावधान रहावे लागते. याचाच अर्थ असा की आत्मचरित्रलेखनातील कलात्मकता ही आपोआपच त्या लेखनातून निर्माण व्हावी, त्यासाठी लेखकाने जाणीवपूर्वक कोणतेही प्रयत्न करू नयेत. प्रत्येक आत्मचरित्रकाराचे लेखन हे ' स्वतंत्र ' असावे लागते. परंतु आपले लेखन रुक्ष होणार नाही, याची लेखकाने काळजी घेतली पाहिजे.

आत्मचरित्रात लेखक आपल्या जीवनात घडलेल्या घटनांचे निवेदन करीत असतो. या घटना विविध प्रकारच्या असू शकतात. त्यामुळे त्याच्या लेखनात विविध भावनांचा अविष्कार होऊ शकतो. आपल्या जीवनातील सुखदु:खांचे प्रसंग उत्कटपणे सांगताना त्याच्या लेखनात भावसौंदर्य निर्माण होऊ शकते. उत्कटतेतून निर्माण होणारे , भावसौंदर्य नसेल तर त्याचे लेखन रुक्षनिवेदन होईल, केवळ तपशील होईल. त्याच्या लेखनात उत्कटता हवीच, म्हणजेच

भावनात्मकता हवी. परंतु ही भावनात्मकता निर्माण ह करीत असताना लेखकाला तारेवरची कसरत करावी लागते. कारण हे त्याचे लेखन अधिक भावनोत्कट झाले की त्यातील सत्य थोडे शबलित होते. याउलट भावनेपासून अलिप्त राहून त्याने लेखन केले तर ते नीरस आत्मनिवेदन ठरते. याचा अर्थ आत्मचरित्रकाराने भावशील असावयास हरकत नाही, परंतु भावशरण असू नये. अेक प्रकारचा संयम बाळगून सत्यकथनाच्या अुद्दिष्टाचा विसर पडू न देता अुत्कटतेने लेखन केले तर त्यात भावसौंदर्य निर्माण होअू शकते. त्यासाठी लेखकाच्या जीवनातच विविध प्रकारच्या घटना घडणे आवश्यक असते. अेकाच प्रकारच्या घटना घडलेल्या असतील तर त्याच्या लेखनात अेकच अेक विशिष्ट प्रकारची भावना आविष्कृत होअील आणि त्याचे लेखन अेकसुरी बनेल, ते आकर्षक वाटणार नाही, परंतु विविध प्रकारच्या घटना असतील तर मग मात्र विविध प्रकारच्या भावना आविष्कृत होतील व विविधतेचे सौंदर्य निर्माण होअील. विविध रसनिर्मिती ही वाचकांना नेहमीच आनंद देते. त्या दृष्टीने विविध भावनांचा आविष्कार होणे आवश्यक असते. परंतु विविध भावनांचा अविष्कार करण्यासाठी आत्मचरित्र लेखकाला विविध प्रकारचे प्रसंग मात्र निर्माण करता येणार नाहीत. त्यामुळे जे प्रसंग घडलेले आहेत, त्या प्रसंगामध्येच त्याला हा [redacted] भावविलास दाखवावा लागतो. अेका अर्थाने लेखकाच्या जीवनाच्या स्वरूपावरच हे अवलंबून आहे.

**समाजदर्शन .**

आत्मचरित्रात लेखकाने स्वत:च्या जीवनाचे चित्रण केलेले असले तरी आत्मचरित्रात त्या विशिष्ट व्यक्तीच्या ( लेखकाच्या ) दर्शनाबरोबरच ती व्यक्ती ज्या कालखंडात राहते, त्या कालखंडाचेही त्यातून दर्शन घडते. कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्व हे केवळ स्वयंभू असत नाही, ते व्यक्तिमत्व सभोवतालच्या जीवनाचे संस्कार घेत असते. मनुष्य हा समाजजीवनाचा अेक घटक

असल्याने समाजजीवनाच्या क्रिया - प्रतिक्रिया त्याच्या व्यक्तिमत्वावर व जीवनावर होत राहतात. मनुष्य कितीही आत्मकेंद्रित व ऐकलकोंडा असला तरी समोवतालच्या जीवनप्रवाहापासून तो पूर्णत: अलिप्त राहू शकत नाही. सुप्रसिध्द साहित्यिक वि.वा. शिरवाडकर यांनी कलावंताचे व्यक्तिमत्व व जीवन या संदर्भात काढलेले उद्गार अर्थपूर्ण आहेत. त्यांनी म्हटले आहे, ` जीवनाच्या ज्या परिसरांत आपण वावरतो, त्यापासून साहित्य हे अलग काढता येईल, हे शक्य नाही. साहित्यिकाची प्रतिमा कितीही आकाशमार्गी असली तरी त्याचे पाय नव्हे, त्याचं सारंच जीवन पृथ्वीवर टेकलेलं असतं. लेखकाचं व्यक्तित्व हे त्याच्या वाड्.मयाचं अधिष्ठान असतं हे कोणीच नाकारत नाही, परंतु हे व्यक्तिमत्व सुध्दा सामान्यत: मानलं जातं तितकं स्वयंभू आणि स्वतंत्र असत नाही. परिसरातील परिस्थितीचे नानाविध संस्कार त्याच्यावर होत असतात व त्या क्रिया- प्रतिक्रियातून त्याला विशिष्ट आकार, विशिष्ट रंग प्राप्त होतो. '[२२] हे विधान सर्वांनाच लागू पडणारे आहे. याचाच अर्थ कोणत्याही वाड्.मयीन कलाकृतीमध्ये त्या कृतीच्या लेखकाचे प्रतिबिंब उमटलेले असते. त्याप्रमाणे त्या व्यक्तीच्या समोवतालच्या समाजाचेही प्रतिबिंब उमटलेले असते. निदान आत्मचरित्राच्या बाबतीत हे अधिक खरे आहे. लेखकाचा जो नवीन कालखंड असेल त्या कालखंडातील कौटुंबिक जीवन, धर्मजीवन, चालीरीती, रुढी, परंपरा, अशा विविध सामाजिक प्रवृत्तींचे प्रतिबिंब आपोआपच आत्मचरित्रात व्यक्त होते. परंतु याचा अर्थ असा नव्हे की आपल्या कालखंडातील समाजजीवनाचे दर्शन घडविण्यासाठी लेखक आत्मचरित्र लिहीत असतो. त्यादृष्टीने आत्मचरित्र लिहिले तर त्यात आत्मचरित्र कमी व अितिहास अधिक होअील व आत्मचरित्राला झळ पोहोचेल. आचार्य अत्र्यांच्या ` मी कसा झालो ' मध्ये जीवनघटनांना व व्यक्तिदर्शनाला महत्व मिळाले आहे. परंतु तेच ` कऱ्हेचे पाणी ' या आत्मचरित्रामध्ये महाराष्ट्राचा गेल्या पन्नास वर्षांचा राजकीय ,

सामाजिक व वाङ्मयीन अितिहास वाचकापुढे ठेवण्याचा संकल्प करून त्यांनी आत्मचरित्राच्या कलात्मकतेला बाधा आणली आहे. असाच प्रकार वि.द. घाटे यांच्या ' दिवस असे होते ते या आत्मचरित्रातही आढळतो: म्हणून आत्मचरित्रात येणारे समाजदर्शन हे सहजतेने व पार्श्वभूमीसारखे यावे, हे अधिक अुचित होय. तथापि कमीअधिक प्रमाणात आत्मचरित्रात समाजदर्शन घडत असल्याने त्या दृष्टीनेही आत्मचरित्राचा अभ्यास होअू शकेल.

व्यक्तिचित्रण -

आत्मचरित्र ही अेक जीवनकथा असते हे खरे असले तरी ती अेक चरित्रकथा असते. स्वत: लेखकाच्याच जीवनाचे ते अेक चित्र असते. त्यामुळे आत्मचरित्रात लेखकाच्या व्यक्तिमत्वाची अनेक गुणवैशिष्ट्ये व्यक्त झालेली असतात. येथे स्वत: लेखकच आपल्या जीवनातील घटनांचे निवेदन करीत असल्यामुळे त्याचे अनुभव, आशा-आकांक्षा, सुखदु:खे , रागलोभ, जीवनदृष्टिकोन - अशा अनेक गुणधर्मांचे प्रतिबिंब अुमटून त्या लेखकाची अेक प्रतिमा तयार होत असते. आत्मचरित्रातील कथेत महत्व असते ते या व्यक्तिमत्वालाच. येथे अेक प्रश्न असा अुपस्थित होअू शकेल की आत्मचरित्रात घटना महत्वाच्या की व्यक्तित्व महत्वाचे ! कोणत्याही कथेत प्राधान्य हे घटनेला द्यावयाचे की व्यक्तित्वाला, यासंबंधी परस्परविरोधी विधाने करण्यात येतात. अुदाहरणार्थ, घटनामुळे व्यक्तित्व बनते. ( Plot creates the character). या अुलट व्यक्तित्व घटना निर्माण करते. ( Character creates the plot ). वास्तविक पाहता घटना या स्वभावामुळेच निर्माण होतात. अॅरिस्टॉटलच्या शोकांतिकेवर विचार मांडताना अेस.अेस. बुचर याने म्हटले आहे, " The action is the product of the character and of the circumnstances in which they are placed. " २४ शोकात्म्यासंबंधीचे हे विधान जीवन

लागू पडते. व्यक्तीच्या स्वभावामुळेच जीवनात विविध प्रकारच्या घटना घडत असतात. अर्थात घटनांचा त्या व्यक्तीच्या स्वभावावरही परिणाम होत असतो. परंतु त्या सर्वातून आपल्यासमोर अुभे राहते ते व्यक्तित्व. त्यामुळे आत्मचरित्रातील जीवनदर्शनापेक्षा त्यातील व्यक्तिदर्शन हे सर्वात अधिक महत्वाचे असते. यासंबंधी ` ग्रंथकाराचे चरित्र म्हटले तरी त्याचा प्रमुख हेतू व्यक्तिचित्रण हाच असावयास पाहिजे ` हे प्रा. अ.म. जोशी यांचे विधान समर्पक वाटते. [२५]

आत्मचरित्रामध्ये व्यक्तीची मनोवृत्ती, तिची ध्येये, आयुष्यातील झगडे, त्यावेळेला त्या व्यक्तीच्या स्वभावधर्माचे दिसून आलेले गुणदोष या सर्वांचे प्रतिबिंब यथार्थपणे अुमटलेले असते. हे व्यक्तिदर्शन सत्यपूर्ण असावे असे म्हटले जाते, याचा अर्थ - आत्मचरित्रकाराला कथा-कादंबरी - नाटकाप्रमाणें कल्पनाविलासाचे साह्य घेता येत नाही, जसे घडले असेल तसेच प्रसंगांचे व स्वभावाचे चित्रण करावे लागते. अेका दृष्टीने ` अनुभवांशी आत्मनिष्ठा आत्मचरित्र लेखनाच्या ठायी असावी लागते. सत्यदर्शन, यथार्थदर्शन तटस्थता हे गुण जे निर्माण होतात ते यातूनच. यामुळे लेखकाला मर्यादा पडत असते, तरी त्या मर्यादेत राहूनही तो स्वत:ची व अितरांची व्यक्तिचित्रे परिणामकारकरित्या रंगवू शकतो. यादृष्टीने पाहता चरित्राच्या संदर्भात सिडने ली याने ' a truthful transmission of personality ' [२६] म्हणजे - व्यक्तित्वाचे सत्यपूर्ण चित्रण हा चरित्राचा जो हेतू सांगितला आहे, तो आत्मचरित्राच्या बाबतीतही खरा ठरतो.

आत्मचरित्रातील व्यक्तिदर्शनात अनेक पात्रे असली तरी स्वत: लेखक हा त्या जीवनकथेचा नायक असतो. आत्मचरित्राच्या केन्द्रस्थानी त्याच्यातील ` मी ` असतो, त्यामुळे आत्मचरित्रात लेखकाच्या व्यक्तिमत्वाला महत्व प्राप्त होणे अपरिहार्य असते. स्वत:च स्वत:चे चित्र रेखाटणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे.

कारण लेखकाने आपल्या जीवनातील घडामोडींच्या आधारे आपली भूमिका स्पष्ट केली, आपली मते मांडली व आपले गुण सांगितले की त्यावर आत्मसमर्थनाचा, आत्मप्रौढीचा आक्षेप येतो. याउलट केवळ घटनांचे वर्णन केले आणि भूमिका स्पष्ट केली नाही तर संकोचाचा, लीनतेचा आरोप येतो. आत्मप्रौढी व आत्मश्लाघा या दोन्ही ~~या दोन्ही~~ गोष्टी टाळून आत्मदर्शन घडविणे अत्यंत कठीण गोष्ट आहे. याचे कारण असे की प्रत्येकाला स्वतःचे कुतूहल असते, प्रत्येकजण 'स्व' मध्ये गुरफटलेला असतो. आत्मप्रेमामुळे 'नार्सिसस' प्रमाणे माणसे स्वतःच्या प्रतिबिंबावर प्रेम करतात. आत्मचरित्र-लेखनात अहंकाराचे तर्पण होते, तो कुरवाळला जातो. लेखकाला तटस्थता हवी असते ती याच बाबतीत. वास्तविक पाहता लेखकाला जसे वाटेल तसे त्याने लिहावे, वाचक वा समीक्षक काय म्हणतील याचा विचार करून जर त्याने आत्मचरित्र लिहिले तर तो अेका दडपणाखाली राहील व त्याच्या हातून आत्मवंचनेचा अपराध घडेल. पर्यायाने त्या लेखनाच्या उत्कटतेवर व कलात्मकतेवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून असे म्हणावेसे वाटते की आत्मचरित्रकाराने 'आत्म' शीच प्रामाणिक रहावे. त्याने मनमोकळेपणाने लिहिल्याशिवाय त्याच्या गुणदोषांचे दर्शन तरी कसे घडेल ? आत्मचरित्रातील त्याच्या जीवनानुभवातून रसिकांनी व समीक्षकांनी त्याचे व्यक्तिचित्र शोधायचे असते. त्याचे गुणदोष, स्वभाववैशिष्ट्ये, जीवनदृष्टी, त्याचा व्यक्तित्व-विकास अित्यादी गुण पाहून त्याचे व्यक्तिमत्व पहावयाचे असते. ते त्या संपूर्ण व्यक्तीचे चित्र असू शकणार नाही. कारण ती संपूर्ण व्यक्ती आत्मचरित्राच्या व्यक्तीपेक्षा वेगळी व व्यापक असू शकते. आत्मचरित्रातील व्यक्तिमत्व हा त्या व्यक्तिमत्वाचा अेक भाग असतो. आत्मचरित्रातून स्वतः लेखक स्वतःकडे पाहतो हे दिसून येते. अर्थात आत्मचरित्रातील 'मी' चे चित्रण स्वतः लेखकानेच केलेले असल्याने ते आत्मनिष्ठच राहणार, म्हणून वस्तुनिष्ठतेच्या कसोट्या सावधानतेने वापराव्या लागतील.

आत्मचरित्रात स्वत: लेखकाबरोबर अितरांचीही व्यक्तिचित्रे आलेली असतात. लेखक जीवन जगत असताना त्याच्या आयुष्यात त्याच्या जीवनाला अनुकूल प्रतिकूल असणारी अनेक पात्रे आलेली असतात. त्यातील काही पात्रे त्या व्यक्तीच्या जीवनात खोलवर ठसा अुमटविणारी , सुखदु:खाचे प्रसंग निर्माण करणारी, संघर्ष निर्माण करणारी, जीवनाला कलाटणी देणारी, म्हणूनच अेका दृष्टीने त्याचे जीवन घडविणारी असतात. अशा व्यक्तित्वाचा आत्मचरित्रकाराने वेध घेतलेला असतो. ही पात्रे जशी स्वतंत्र असतात, तशी आत्मचरित्रातील ` मी ` शी संबंधित असतात. ` मी ` च्या अेका मोठया वर्तुळात सामावलेली ही छोटी छोटी वर्तुळे असतात. ही वर्तुळे परस्परामध्ये गुंतलेली असल्याने त्या मोठया मोठया वर्तुळात अेक ` गुंतावळ ` निर्माण होते. म्हणून डॉ. स.दा.क-हाडे यांनी म्हटले आहे , ` आत्मचरित्र हे केवळ ` स्व ` भोवतीच केंद्रित असू शकत नाही. ` स्व ` भोवती असणारे आप्तेष्ट , जिवलग मित्र, सख्यसंबंधी आणि हितशत्रू याची देखील त्यात गुंतवणूक असते. ` २७

आत्मचरित्रात लेखक जेंव्हा दुस-या व्यक्तिमत्वाचा वेध घेतो, तेंव्हा तो आपल्याच दृष्टिकोणातून वेध असल्याने त्यामध्ये अलिप्तता व वस्तुनिष्ठता निर्माण होणे अवघड असते, कारण लेखक ` स्व ` ला पूर्णत: अलिप्त ठेवू शकत नाही. ही व्यक्तिचित्रे लेखकाच्या दृष्टिकोणातून रेखाटलेली असल्याने त्याला मर्यादा पडणे स्वाभाविक असते. आत्मचरित्राचा अभ्यास करताना या स्वाभाविकपणे पडणा-या मर्यादा गृहीत धरूनच लेखकाने स्वत:चा व अितर व्यक्तिमत्वांचा ` व्यक्तिवेध ` कसा घेतला आहे , हे पाहणे अुचित ठरेल.

* * *



वरील चर्चेत आपणास आत्मचरित्राचा अेक वाड्.मयप्रकार म्हणून अभ्यास करताना आढळून येणाऱ्या गुणवैशिष्ट्यांचे विश्लेषण केलेले आढळते. त्या आधारे आत्मचरित्रासंबंधी महत्वाच्या गोष्टी समजतात. त्या सारांशरुपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील:-

साहित्यकला ही अितर कोणत्याही कलेपेक्षा मानवी जीवनातील अधिक महत्वाची व सामर्थ्यशाली अभिव्यक्ती आहे. ही अभिव्यक्ती वस्तुनिष्ठ व आत्मनिष्ठ अशा दोन पद्धतीने लेखक साहित्यातून व्यक्त करतो. आत्मचरित्र हा आत्मनिष्ठ प्रवृत्तीतून निर्माण झालेला वाड.मयप्रकार आहे. त्याचे अितिहासाशी व वाड.मयाशी नाते असल्याने अितिहासाची सत्यनिष्ठता व कथावाड.मयाची मनोरंजकता यांचा मिलाफ आत्मचरित्रात होत असतो. त्यामुळे आत्मचरित्र हे अेकाच वेळी अितिहास आणि कादंबरी असते. तथापी मानवी जीवनाचे चित्रण अेका विशिष्ट आकारात व तंत्रात बसविणे कठीण असल्याने आत्मचरित्र हा अेक मुक्त वाड.मयप्रकार आहे. आत्मचरित्रात चरित्रविषयीभूत व्यक्ती व चरित्रलेखक अेकच असल्याने आत्मचरित्र हे कधीही संपूर्ण असू शकत नाही. त्याचा चरित्र, कादंबरी, कथा या वाड.मयप्रकाराशी काही बाबतीत संबंध असला तरी त्या वाड.मयप्रकारापेक्षा आत्मचरित्राचे स्वरुप हे वेगळे व स्वतंत्र असते. कारण या वाड.मयप्रकारात सत्यदर्शनाला अधिक महत्व देण्यात येते. सत्यदर्शना बरोबर आत्माविष्कार, जीवनबोध, सिंहावलोकन, मतप्रचार अित्यादी प्रेरणा असतात. तथापि वस्तुनिष्ठ भूमिकेवरुन घेतलेला आत्मशोध हे आत्मचरित्राचे खास वैशिष्ट्य असते. आत्मचरित्र लिहिणाऱ्या लेखकाच्या ठायी सत्यदर्शन, तटस्थता, प्रामाणिकपणा, कलात्मकता, रंजकता, अुत्कटता, चिंतनशीलता, भावनात्मकता अित्यादी गुण असावे लागतात. आत्मचरित्राचे विविध घटक असले तरी व्यक्तिचित्रण हा महत्वाचा घटक असून आत्मचरित्रात चरित्रनायक असलेल्या व्यक्तीच्या स्वभावाचे प्रतिबिंब अुमटलेले असते.

.....

# संदर्भ - सूचि


१. Arnold, Mathew - The study of poetry - English Critical Texts - Edited by D.J. Enright and Ernst De Chickera - Oxford University Press, Delhi. Third impression 1979. Page 261.

२. मराठी विश्वकोश - खंड दुसरा
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई,
प्रथम प्रकाशन १९७६, पृष्ठ - ११.

३. जोशी, अ.म. - चरित्र - आत्मचरित्र
सुविचार प्रकाशन मंडळ प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर,
१९५६, पृष्ठ १०३.

४. Maurois, Andre - Aspects of Biography, Cambridge University Press, 1929, page 133.

५. Wellek and Warren -
Theory of Literature - Penguin Books, Third Edition - Reprinted 1968, page 75.

६. Naik, Dr.D.G. - Art of Autobiography, Vidarbha Marathwada Book Company, Poona. First published 1962, page 13.

७. तत्रैव, पृष्ठ - १७.

८. जोशी उनि, पृष्ठ ७०.

९. गाडगीळ, गंगाधर - साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२, पृष्ठ -७१.

१०. नाईक उनि, पृष्ठ ११.

११. Encyclopaedia Britannica , Vol.2 ,
Encyclopaedia Britannica, Ltd.
William Benton, Publisher,
London, 1963. Page 854.

१२. कुसुमाग्रज ( संपादक ) - ` पिंपळपान `
कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, व्दितीय आवृत्ती -
` माझा मृत्युलेख ` पृष्ठ १०८.

१३. बेडेकर , मालती - ` माझे आत्मचरित्र आणि मी `
` ललित ` दिवाळी अंक - नोव्हें-डिसें. १९८१, पृष्ठ ४८.

१४. जोशी अुनि , पान १०६.

१५. तत्रैव , पृष्ठ १०६.

१६. तत्रैव , पृष्ठ १०६.

१७. गाडगीळ अुनि , पृष्ठ ६८-६९ .

१८. मर्ढेकर , बा.सी. - सौंदर्य आणि साहित्य ,
मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती १९७५ , पृष्ठ १४६.

१९. देशपांडे , अ.ना. - आधुनिक मराठी वाङ्मयाचा अितिहास ,
भाग दुसरा , व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली १९५८, पृष्ठ ५२.

२०. परनळेकर, गोदावरी - ` माझे आत्मचरित्र आणि मी `
` ललित ` दिवाळी अंक नोव्हें. - डिसें.-१९८१, पृष्ठ -५१.

२१. ग्रामोपाध्ये, डॉ.गं.ब. - ` आजचे समीक्षक `
` ललित ` अेप्रिल १९८२, पृष्ठ ३८.

२२. जोशी अुनि , पृष्ठ १४१.

२३. शिरवाडकर, वि.वा. - अध्यक्षीय भाषण ,
मुंबअी अुपनगर म.सा. संमेलन अधिवेशन चौदावे १९५६,
वीणा मे १९६४, पृष्ठ ३१.

२४. Aristotle's Theory of poetry and Fine Arts '
Dover Publications INC, USA 4th Edition 1907,
Page 355.

२५. जोशी, अ.म. - प्रदक्षिणा - ' चरित्र वाङ्मय '
कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, ३०.
पाचवी आवृत्ती १९७२, पृष्ठ १९९.

२६. Nicolson, Harold - The Development of English
Biography, The Hogarth Press, London, 1959,
page 145.

२७. क-हाडे, डॉ.सदा - चरित्र आणि आत्मचरित्र ( साहित्यरुप )
लोकवाङ्मयगृह प्रा.लि.मुंबई, प्रथमावृत्ती १९७६, पृष्ठ -९१.

.....